# सहसंचालक,, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्र. 0712-6465145/46 कार्यासन दु. क्र. 0712-6465145
E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website: rdtenagpur.org.in

**अत्यंत महत्वाचे**

क्र.तशिस/प्राकाना/शैवि-1/DTE Code/2017/ 1360
दिनांक:- 24 MAY 2017

प्रति,

संचालक/प्राचार्य,
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई व हया कार्यालयाशी पत्रव्यवहार करतांना संस्थेच्या Letter Head व DTE Code नमुद करण्याबाबत.

संदर्भ:- या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिस/विकाना/शैवि-2/पदवीका/2015-16/138, दि. 14/01/2016

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने, या कार्यालयाव्दारे तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई व हया कार्यालयाशी पत्रव्यवहार करतांना संस्थेच्या Letter Head व ठळक अक्षरात DTE Code नमुद करण्याबाबत कळविण्यात आले आहे. परंतू ब-याच संस्था त्यांच्या Letter Head व DTE Code नमुद करत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

या पत्राव्दारे आपणास कळविण्यात येते की, **यापुढील पत्रव्यवहारात आपल्या संस्थेच्या Letter Head वर ठळक अक्षरात DTE Code नमुद नसल्यास** आपले पत्र या कार्यालयात स्विकारले जाणार नाही याबाबत नोंद घ्यावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर

**प्रत**:- आवक जावक विभाग, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांना सुचित करण्यात येते की, संस्थेच्या Letter Head व DTE Code नमुद नसल्यास पत्र स्विकारू नये.

C:\Meshram Degree\Letters\Letter to All Institute.doc

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्र निकेतन परिसर, सदर, नागपूर.
दुरध्वनी क्रं.-२५६५१४३ E-mail: ronagpur.dte@gmail.com
फॅक्स क्रं.- ०७१२-२५६१६६३ Web Site :- www.rdtenagpur.org.in

**अतिमहत्त्वाचे**

क्रमांक :- तंशिस/विकाना/शैवि-२/पदविका/२०१५-१६/ 138
दिनांक:- 14 JAN 2016

प्रति,
संचालक / प्राचार्य,
सर्व पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी तसेच तत्सम संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

**विषय:- संचालनालय व तत्सम कार्यालयांशी पत्रव्यवहार करताना संस्थांच्या मुखपत्रावर (Letter Head) संस्थेचा सांकेतांक नमुद करण्यांबाबत.**

संदर्भ:- तंत्रशिक्षण संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक:- २/एनजीपी/संकेतांक/२०१६/१४, दि. ०५/०१/१६.

उपरोक्त संदर्भांकित परिपत्रकाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यांत येते की, आपण तंत्रशिक्षण संचालनालय व तत्सम कार्यालयांशी पत्रव्यवहार करताना मुखपत्रावर (Letter Head) संचालनालयाकडून प्रदान करण्यांत आलेला संस्थेचा सांकेतांक (DTE Code) नमुद करत नाहीत. त्यामुळे संचालनालयास कार्यवाही करताना तांत्रिक अडचणी निर्माण होतात.

**नागपूर विभागातील सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या** अधिपत्याखालील सर्व **व्यावसायिक पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना (शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित)** उपरोक्त संदर्भांकित परिपत्रकान्वये असे आदेशित करण्यांत येते की, आपल्या **संस्थेकडून महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय व विभागीय कार्यालय तसेच तत्सम कार्यालयांशी पत्रव्यवहार करताना संस्थेंच्या मुखपत्रावर (Letter Head) संचालनालयाकडून प्रदान करण्यांत आलेला संस्थेचा सांकेतांक क्रमांक (DTE Code) ठळकपणे (BOLD) नमुद करण्यात यावा.** त्याचप्रमाणे **सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक. मभावा-२०१०/प्रक्र७५/२०-ब, दि. १४/०७/२०१० नुसार शासकीय कामकाजामध्ये राजभाषा मराठीचा वापर. कटाक्षाने करण्यांत यावा** व संदर्भिय परिपत्राकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यांत यावी.

**सहपत्र:- वरीलप्रमाणे.**

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

**प्रत:- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांना माहितीकरीता मानार्थ सादर.**

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


परिपत्रक

क्रमांक:२/एनजीसी/संकेतांक/२०१६/१४

दिनांक : 15 JAN 2016

संचालनालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, महाराष्ट्र राज्यातील या संचालनालयाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सर्व संस्था संचालनालय व तत्सम कार्यालयांशी पत्रव्यवहार करताना त्यांच्या मुखपत्रावर (LETTER HEAD) संचालनालयाकडुन प्रदान करण्यात आलेला संकेतांक क्रमांक (DTE CODE) नमुद करत नाहीत, त्यामुळे कार्यवाही करताना तांत्रिक अडचणी निर्माण होतात.

परिणामी, महाराष्ट्र राज्यातील या संचालनालयाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या (पदविका,पदवी, पदव्युत्तर पदवी) सर्व संस्थांना (शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित ) या परिपत्रकान्वये असे आदेशित करण्यात येते की, आपल्या संस्थेकडुन शासन, संचालनालय, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय त्याचप्रमाणे तत्सम कार्यालयांशी पत्रव्यवहार करताना संस्थेच्या मुखपत्रावर (LETTER HEAD) संचालनालयाकडुन प्रदान करण्यात आलेला संकेतांक क्रमांक (DTE CODE) ठळकपणे (BOLD)नमुद करण्यात यावा. त्याचप्रमाणे शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.मभावा-२०१०/प्रक्र७५/२०-ब, दि.१४.०७.२०१० नुसार शासकीय कामकाजामध्ये राजभाषा मराठीचा वापर कटाक्षाने करण्यात यावा.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपुर यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सर्व संस्थांच्या निदर्शनास आणुन परिपत्रकाची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत निर्देशित करण्यात यावे.
२. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. २अ, ४, ४अ, ५, ६, ८, ९, १०,११, १२, १३, १५, १६ यांना माहितीकरीता.
३. कार्यासन क्र.३ यांना माहिती व संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता.


सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
जावक क्रमांक 301
दिनांक 12 JAN 2016